क्र.२/नसचि/प्रशासक/ ०६ / २०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :-३० ऑगस्ट २०२४

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०६/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०२/०९/२०२४ रोजी दु.१२.३० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२२/०८/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षिकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन (NPS) योजना लागू करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.२९/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

३. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत या सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१६ मध्ये वाल्मिकी हौ.सो.करिता सांस्कृतिक भवन इमारत बांधकाम करणे र.रु४० लक्ष मात्रचा मंजूर कामाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकी मान्यता व निधी मंजुरीस्तव सादर करणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०२/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमधील एम.एस.ई.बी.सब स्टेशन करीता त्यांचेकडे असलेली येणेबाकी वसुल करण्याच्या अटीस अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ (ड) अन्वये सहा.संचालक नगररचना यांनी भाडे मुल्यांकन केलेनुसार जागा देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता कर) यांचे दि.०२/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५ दिनांक :- ०२/०९/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.०६ दि.०२/०९/२०२४ रोजी महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे,सांगली येथे दुपारी १२:३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.शुभम गुप्ता – प्रशासक	१०.	श्री.तेजस शहा - ज्यु.इंजि.वर्कशॉप सांगली
२.	श्री.रविकांत आडसुळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज	११.	श्री.रंगराव आठवले – प्रशा.अधिकारी. शि.मंडळ
३.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त मालमत्ता व्यवस्थापन	१२.	श्री.शंकर भंडारी – ग्रंथपाल
४.	श्री.संजीव ओहोळ – उपायुक्त, मिरज	१३.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेंजर
५.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक	१४.	श्री.राजेंद्र काकडे – नगररचनाकार, सांगली
६.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी (आस्थापना)	१५.	श्री.समिर जमादार – विधी विभाग अधिकारी
७.	श्री.चिदानंद कुरणे – जलवि/ पा.पु., सांगली / मिरज	१६.	श्री.सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी
८.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त १/ नगरसचिव	१७.	श्री.घोरपडे – अतिक्रमण अधिकारी
९.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४	१८.	

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२२/०८/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षिकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन (NPS) योजना लागू करणेस धोरणात्मक निर्णय घेणे.
प्रशासक	कार्यरत शिक्षक व शिक्षिकेत्तर कर्मचारी कर्मचारी यांचे देय होणाऱ्या अंशदानापोटी एकूण रक्कम यांच्या सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.
विषय क्र.०३	सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत या सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१६ मध्ये वाल्मिकी हौ.सो.करिता सांस्कृतिक भवन इमारत बांधकाम करणे र.रु४० लक्ष मात्रचा मंजूर कामाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकी मान्यता व निधी मंजुरीस्तव सादर करणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०४	सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीमधील एम.एस.ई.बी.सब स्टेशन करीता त्यांचेकडे असलेली येणेबाकी वसुल करण्याच्या अटीस अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ (ड) अन्वये सहा.संचालक नगररचना यांनी भाडे मुल्यांकन केलेनुसार जागा देणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज सर्व उपस्थित अधिकारी यांच्या सहमतीने पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

All pages signed.

दिनांक :- ०२/०९/२०२४

(शुभम गुप्ता,मा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७६ **दिनांक :-** ०२/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.२२/०८/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.७१ ते ठराव क्र.७५ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुधाम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा लिपिक

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७७ **दिनांक :- ०२/०९/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.२९/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सदर प्रस्तावानुसार शिक्षण विभागाकडील कार्यतर शिक्षक व शिक्षकेत्तर यांना दि.२२/०२/२०२२ चे शासन निर्णयानुसार राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. तथापि, शिक्षण मंडळाकडील दि.०१ नाव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचारी व शिक्षक यांना दि.०७ मे २०२१ पासून परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) योजना लागू करणेत आलेली आहे. तसेच, सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून सद्या नियोक्ताचे अंशदान ७% चालू आहे. त्यानुसार दि.०१ नोव्हेंबर २००५ पासून ते दि.३१ मार्च २०१९ पर्यत १०% आणि दि.०१ एप्रिल २०१९ ते (DCPS) योजना लागू केले दिनांकापर्यत १४% प्रमाणे आणि (DCPS) योजना लागू केले दिनांकापासून ते आजतागायत सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे देय होणाऱ्या अंशदानापोटी एकूण रक्कम यांच्या सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

(सुधाम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासन अधिकारी (इ.मंडळ)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७८ **दिनांक :-** ०२/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०२/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र.-मनपा-२०२३/प्र.क्र.८७-क (७७)/नवि-१६ दि.१४/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२३-२४, महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत एकूण ५ कामांकरीता र.रु.१.६५ कोटी मात्र मंजूर झाले असून, सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असून, सदर शासन निर्णयानुसार शासन अनुदान १००% आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.-मनपा-२०२३/प्र.क्र.८७-क (७७)/नवि-१६ दि.१६/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१४/०२/२०२४ रोजी शासन निर्णयातील काम क्र.२ प्रभाग क्र.१६ मध्ये वाल्मिकी हौ.सो.करिता सांस्कृतिक भवन अंतर्गत गटार,कॉक्रिट रस्ते करणे र.रु.४० लक्ष या कामास कार्यारंभ आदेश दिला नसल्यास सदरचे काम रद्द करुन त्याऐवजी प्रभाग क्र.१६ मध्ये वाल्मिकी हौ.सो.करिता सांस्कृतिक भवन इमारत बांधकाम करणे र.रु.४० लक्ष मात्रच्या कामास शासन शुद्धीपत्रकान्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार प्रभाग क्र.१६ मध्ये वाल्मिकी हौ.सो.करिता सांस्कृतिक भवन इमारत बांधकाम करणे र.रु.४० लक्ष मात्रच्या मंजूर कामाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७९ **दिनांक :-** ०२/०९/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारान्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (मालमत्ता विभाग) यांचे दि.०२/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी महानगरपालिकेकडे मागणी केलेल्या पाच जागांपैकी खालील प्रमाणे तीन जागा निश्चित करणेत आलेल्या आहेत.

१. शिंदे मळा सांगली, उर्मिलानगर स.नं. २५०/११ क्षेत्र १९६०.०० चौ.मी. जागा
२. कुंभार मळा, वानलेसवाडी स.नं.५७ खुली जागा क्रं.३ क्षेत्र १४६७.७० चौ.मी.
३. गणी मळा मिरज स.नं.६२जुना स.नं.२९/१/ब खुली जागा क्रं.१ खुली जागा क्षेत्र २०००.०० चौ.मी.

उपरोक्त नुमद केलेनुसार एकुण तीन जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना देणेस हरकत नाही.

तथापि, यापुर्वी मा.महासभा ठराव क्र.१२१ दि.२१ जानेवारी २००९ अन्वये झालेल्या मान्यतेनुसार खालील नमुद केलेल्या जागा नमुद शर्ती-अटीनुसार देणेत आलेल्या आहेत.

१. स.नं. ४८९/ब, टि.व्ही.स्टेशन लगतची सांगली –कोल्हापूर रोड -१३२ के.व्ही.
२. स.नं. २६९, माकडवाले समाज स्मशान भूमी समोरील जागा (M.S.E.B. कडे सुचविण्यास योग्य)
३. जुना स.नं. २७४, नवा स.नं. २५२, कुपवाड (M.S.E.B. कडे सुचविण्यास योग्य)
४. फायनल प्लॉट क्रं. ७२/अ, मिरज बळवंत मराठे विद्यालय शेजारी
५. मालगांव रोड सुभाषनगर परिसर, मिरज स.नं. १९५ (M.S.E.B. कडे सुचविण्यास योग्य)

उपरोक्त पाच जागा या बाजारभावाप्रमाणे वार्षिक भाडे र.रु.२०,३५,२००/- मात्र ३० वर्ष मुदतीने भाड्याने देणे, तसेच प्रती तीन वर्षाने सदर जागांची भाडेवाढ करणे, महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्यावरील अडथळा करणारे विद्युत पोल महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने स्वखर्चाने शिफ्ट करणे, अन्यथा वरील जागेच्या मोबदल्यात र.रु.३ कोटी महानगरपालिकेकडे अनामत म्हणून भरणे.

वरील शर्ती-अटीनुसार यापुर्वी पाच जागा देणेत आलेल्या आहेत.

तसेच, सन २०१० साली महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ५ ते ६ कोटी किंमतीच्या जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस हस्तांतरण केलेले आहेत. अद्याप त्याची रक्कम महापालिकेस प्राप्त झालेली नाही. सदरची रक्कम तातडीने वसुलात आणणे याकरीता सविस्तर अहवाल मान्यतेसाठी महासभा ठराव क्र.७९ दि.२०/०८/२०१५ पारित झालेला आहे. त्यानुसार जागेबाबत भाडे वसुल करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे नमुद केलेल्या पाच जागा तसेच, सन २०१० साली सुमारे र.रु.५ ते ६ कोटी किंमतीच्या जागा या महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीस हस्तांतरण केलेल्या आहेत. अद्याप त्याची रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही. सदरची रक्कम तातडीने वसुलात आणणे याकरीता सविस्तर अहवाल मान्यतेसाठी महासभा ठराव क्र.७९ दि.२०/०८/२०१५ पारित झालेला आहे. त्यानुसार उपरोक्त जागेबाबत भाडे वसुल करणे आवश्यक आहे.

... २ ...